आदिवासी उमेदवारांकरिता सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केन्द्र.

व्याख्यात्यांना दिल्या जाणा-या मानधनाच्या दरात सुधारणा करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक- इएमपी १९९०/१७७/[३२] सेयो-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक- १२ जुलै, १९९०.

संदर्भ- १] शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक- इएमपी १०८४/७३०६/[७७७१] सेयो-२, दि. ११ ऑक्टोबर, १९८४.
२] सेवायोजन संचालक, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई यांचे पत्र क्रमांक- सेसं २/आउमेप्रमाके/व्याख्यात्याचे मानधन ३६४६/ दिनांक- २४ जानेवारी, १९९०.

शासन निर्णय:- वरील क्रमांक १ वरील शासन निर्णय, दिनांक- ११ ऑक्टोबर, १९८४ अन्वये आदिवासी उमेदवारांकरिता सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केन्द्रातर्फे उमेदवारांना व्याख्याने देण्यासाठी आमंत्रित केलेल्या प्राध्यापकांना प्रत्येक व्याख्याना रु. २५/- [रुपये पंचवीस फक्त] दराने मानधन देण्याबाबत शासनाने मान्यता दिली होती. मानधनाचा हा दर सुधारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, सदरहू दरात वाढ करून ६० मिनिटांच्या एक तासिकेला रु. ४०/- [रुपये चाळीस फक्त] दराने मानधन देण्यात यावे.

२. यावर होणारा खर्च हा "२२३०-कामगार व सेवायोजन" ह्या लेखाशिर्षाखाली दाखवून त्या खाली केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौ. संदर्भ क्रमांक- ५४८/९०/सेवा-२, दिनांक- ३.७.१९९० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ मो. द. भांडारकर ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत- सेवायोजन संचालक, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई [१५ प्रतींसह].

..२

महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.

महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.

वित्त विभाग/सेवा-९.

आदिवासी विकास विभाग/१२.

रसाळ/१२७.